Peer reviewed Journal Impact Factor:7.265 ISSN-2230-9578

# Journal of Research and Development








*Multidisciplinary International Level Referred Journal*

**April-2022 Volume-13 Issue-21**

Chief Editor
Dr. R. V. Bhole
'Ravichandram' Survey No-101/1, Plot
No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

Editor

**Dr. M.N. Kolpuke**
Principal,
Maharashtra Mahavidyalaya, Nilanga, Dist. Latur

**Dr. V.D. Satpute**
Principal,
Late Ramesh Warpudkar College, Sonpeth, Dist. Parbhani



**Address**
'Ravichandram' Survey No-101/1, Plot,No-23,Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani


| | | |
|---|---|---|
| 38 | दळण वळण नवीन सुधारणा एक विचार प्रवाह<br>श्रीकांत गव्हाणे | 141-143 |
| 39 | महिला उद्यमिता<br>डॉ सुरेखा पिपलानी | 144-146 |
| 40 | आंबेडकरोत्तर काळातील आंबेडकरवादी चळवळी<br>प्रा.डॉ. बी.एम. काळे | 147-151 |
| 41 | मोगलकालीन कृषी व्यवसायाचा ऐतिहासिक दृष्टीकोण<br>पवार डी. व्ही. | 152-154 |
| 42 | भारतातील कौशल्य विकास व योजनांचा चिकित्सक अभ्यास<br>प्रा.पांचाळ विजय किशनराव | 155-157 |
| 43 | स्त्री आणि पुरूषांमधील सामाजिक योगदान आणि भावनिक कार्यकुशलता या घटकांचा तुलनात्मक अभ्यास.<br>शितल भागवत जाधव प्रा.डॉ.रमेश पठारे | 158-162 |
| 44 | उद्योजक आणि महिला उद्योजकांची वाटचाल<br>डॉ. कु. धुतमल वर्षा सिताराम | 163-165 |
| 45 | आधुनिक हिन्दी साहित्य में नारी<br>प्रा. डॉ. वडचकर एस.ए. | 166-168 |
| 46 | बँकींग क्षेत्रातील सुधारणा<br>प्रो.डॉ.एम.डी.कच्छवे | 169-173 |
| 47 | नागरी सहकारी बँकांचा पूर्व इतिहास आणि सद्यस्थिती<br>प्रा. डॉ.अरूण बळीराम धालगडे सय्यद फारुखअली जहूरअली | 174-176 |

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, 20 April 2022, Volume-13, Issue-21

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Tq.Sonpeth Dist.Parbhani

# आंबेडकरोत्तर काळातील आंबेडकरवादी चळवळी

प्रा.डॉ. बी.एग. काळे
मराठी विभाग प्रमुख, कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ जि. परभणी

गोषवारा : आंबेडकरोत्तर कालखंडात आंबेडकरी विचार रुजविण्यासाठी, अस्पृश्यांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी व्यापक प्रमाणात चळवळी उभारल्या गेल्या. त्या चळवळींच्या यशापयशाबद्दल विचारवंतांनी विचार व्यक्त केले आहेत, स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीअनेक राजकीय लढे उभारले. महाडच्या सत्याग्रहापासून ते धर्मांतरापर्यंत त्यांनी जे जे प्रयत्नकेले ते अस्पृश्यांना सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक न्याय मिळावा याच हेतूने; परंतुधर्मांतराच्या ऐतिहासिक घटनेनंतर अल्पावधीतच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महापरिनिर्वाणझाले. त्यामुळे जातिव्यवस्थेचे निर्मूलन करण्याचे, सामाजिक लोकशाही निर्माण करण्याचेआणि गौतम बुद्धाने पुरस्कृत केलेल्या समता, स्वातंत्र्य, बंधुभाव या तत्त्वत्रयीवर आधारलेल्यामानवताधर्माची प्रस्थापना करण्याचे त्यांचे स्वप्न अधुरे राहिले. हे अपुरे स्वप्न पूर्ण करण्यासाठीआंबेडकरोत्तर काळात अनेक चळवळी उभारल्या गेल्या. भूमिहीनांचा सत्याग्रह,बौद्धांच्या सवलती, धर्मांतराची चळवळ, दलित पँथरचे कार्य, नामांतरलढा, मास मुव्हमेंट, दलित मुक्तिसेनेचेकार्य,मंडल आयोग,रिडल्स प्रकरण इत्यादींसंबंधी विविध चळवळी उभारल्या गेल्या.या चळवळींचाआढावा घेऊन डॉ.गंगाधर पानतावणे,राजा ढाले, ज.वि.पवार,डॉ.यशवंत मनोहर,नामदेव ढसाळ, अर्जुन डांगळे इत्यादी विचारवंतांनी या चळवळींच्या यशापयशाचा मागोवा घेतला आहे. भारतीय रिपब्लिकन पक्षाने अस्पृश्यांचेप्रश्न सोडविण्यासाठी आंबेडकरोत्तर काळातविविध चळवळी उभारल्या. रिपब्लिकन पक्ष म्हणजे डॉ. आंबेडकरांच्या संकल्पनेतील पक्ष. शेड्युल्ड कास्ट फेडरेशन बरखास्त करून या पक्षाची निर्मिती करण्यात आली. भारतातील सर्वदुर्बल घटकांना, अल्पभूधारकांना, भूमिहीन मजुरांना, श्रमिकांना, अल्पसंख्याकांना संघटितकरून त्यांना सामाजिक आणि आर्थिक न्याय मिळवून देण्याची घोषणा केली. नुसती घोषणाचकेली असे नव्हे, तर त्या दृष्टीने पाऊलही उचलले; परंतु अवघ्या दोन वर्षांच्या आतच पक्षदुभंगला आणि पुढे चालून वेळोवेळी दुभंगत राहिला. तरीही एन. शिवराज (१९५७ ते १९६४),दादासाहेब गायकवाड (१९६४ ते १९७१), रा. सु. गवई (१९७१ ते १९७९) यांनी पक्षाचे नेतृत्वखंबीरपणे स्वीकारून अस्पृश्यांचे प्रश्न सोडवण्याचा सातत्याने प्रयत्न केला. भूमिहीनांच्याप्रश्नाबरोबर बौद्धांना सवलती मिळाल्या पाहिजेत.

**प्रस्तावना**

, अस्पृश्यांना दीक्षाभूमीची जागा मिळाली पाहिजे, शेतमजुरांवर होणारे अन्याय थांबले पाहिजेत, महागाईला आळा घालावा, झोपडपट्ट्यांची सुधारणा करावी, राखीव जागाचा अनुशेप भरून काढावा, अस्पृश्यता निवारण कायद्याची अंमलबजावणी करावी आणि लोकसभेच्या केन्द्रीय सभागृहात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचेतैलचित्र लावावे, अशा मागण्यांसाठी रिपब्लिकन पक्षाने वेळोवेळी सत्याग्रह, मोर्चे, आंदोलनेकेले. आपल्या प्रश्नांवर अस्पृश्यांना संघटित करून ते प्रश्न त्यांनी सोडवले. या संदर्भात डॉ. रावसाहेब कसबे म्हणतात, "अखिल भारतीय रिपब्लिकन पक्ष हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीभारतीय जनतेला दिलेले शेवटचे राजकीय हत्यार आहे. या हत्याराचा प्रभावीपणे उपयोगकरून भारतीय समाजाच्या सामाजिक, आर्थिक जीवनात लोकशाहीच्या आणि अहिंसक मार्गानेक्रांतिकारी परिवर्तन केले जाईल, असा त्यांना विश्वास वाटत होता." रिपब्लिकन पक्षामार्फत १९६४ साली लढलेल्या भुमिहीनांच्या सत्याग्रहाला अधिक महत्त्वदिले जाते. कारण हा सत्याग्रह देशव्यापी होता. ०१ऑक्टोबर १९६४ रोजी देशाच्या विविध भागांतूनहजारो भुमिहिनांना संसदेवर मोर्चा नेऊन त्या वेळचे पंतप्रधान

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Tq. Sonpeth Dist. Parbhani



लालबहादूर शास्त्री ह्यांना आपल्यामागण्यांचे निवेदन दिले होते. ह्या सत्याग्रहाची आखणी एन. शिवराज ह्यांनी केली होती;पण त्यांचे सत्याग्रहापूर्वीच निधन झाल्याने ह्या सत्याग्रहाचे नेतृत्व दादासाहेब गायकवाड यांनी केले.'कसेल त्याची जमीन, नसेल त्याचे काय?' अशी घोषणा देऊन त्यांनी विराटसत्याग्रह घडवून आणला.या संदर्भात अर्जुन डांगळे म्हणतात,"१९६४साली देशव्यापी भूमिहीनांचाविराट सत्याग्रह झाला. ज्यात तीन लाख चाळीस हजार सत्याग्रही तुरुंगात गेले. सत्याग्रहींनातुरुंग अपुरे पडू लागले होते. धुळ्यामध्ये तर सत्याग्रहींना ठेवण्यासाठी थिएटर भाड्याने घ्यावेलागत होते. हा सत्याग्रह दादासाहेबांच्या शिरपेचातील मानाचा तुरा आहे; पण, डॉ. बाबासाहेबआंबेडकरांच्या नंतर रिपब्लिकन आंबेडकरी चळवळीतील एक सोनेरी पान आहे. "हे जेलभरोआंदोलन पाहून लालबहादूर शास्त्रींनी त्यांच्या वजनाची व कार्याची तोंड भरून प्रशंसा केलीहोती. हे आंदोलन अडीच महिने चालले. भूमिहीनांनी अडीच महिने शर्थीने लढा दिला.शेवटीसरकारला नमते घेऊन सर्व मागण्या मान्य कराव्या लागल्या.त्यानुसार पडीक, फॉरेस्ट व गायरानया तिन्ही प्रकारच्या जमिनी देण्याचा सरकारने निर्णय घेतला.याबाबतज.वि.पवार म्हणतात,"आंबेडकरी जनतेचा आंबेडकरोत्तर चळवळींतील हा पहिला विजय होता. लोकशक्तीच्या बळावर मिळवलेला हा विजय होता. मुकुटातला तो एक शिरपेच ठरला. "विशेष म्हणजे या सत्याग्रहाचे महत्त्व हे केवळ आर्थिक प्रश्नापुरते मर्यादित नव्हते, तर त्याला सामाजिक आशयही होता. कारण जातीच्या, धर्माच्या, पंथाच्या भिंती ओलांडून सगळ्या भारतातील ग्रामीण कष्टकरी जनता या सत्याग्रहात सामील झाली होती. दलित पँथरच्या उदयाबाबत डॉ.लता मुरूगकर लिहितात,"आर्थिक-सामाजिक दुःस्थिती, वाढते अत्याचार, समर्थ व प्रेरक विद्रोही साहित्य निर्मिती व दलित तरुणवर्गाच्या टोकदार झालेल्या जाणिवा ह्याच गोष्टी दलित पँथर चळवळीच्या उदयास निर्णायकपणे कारणीभूत ठरल्या. "डॉ.बाबासाहेब आंबेडकरांवरील असीम श्रद्धा, आंबेडकरवादी समाजाविषयीचा अपार जिव्हाळा, सामाजिक विषमतेविरुद्ध पेटून उठलेले संतप्त तरुण ह्यांमुळे'दलित पँथर'ही अल्पावधीतच राज्यभर पसरली. गावोगाव पँथरच्या छावण्या निघाल्या. पँथर्सची बेदरकार भाषणे, गर्दी खेचणाऱ्या वादळी सभा, हाणामारी, मोर्चे, पोलीस केसेस ह्यांमुळे दलित पँथरची संघटना चर्चेत ठरल्याचीत्या नमूद करतात.

'दलित पँथर' च्या संस्थापकाबद्दलसांगताना प्रल्हाद चेंदवणकर लिहितात, "साहित्यिकनामदेव ढसाळ, ज.वि.पवार, राजा ढाले, प्रल्हाद चेंदवणकर, अर्जुन डांगळे, उमाकांत रणधीरत्याचप्रमाणे साहित्यिक नसलेले; परंतु सभा-संमेलनांमधून बोलणारे भाई संगारे, लतीफ खाटीक हे आणि रामदास सोरटे, गायकवाड व प्रत्यक्ष चळवळीत कार्य करणारे इतर कार्यकर्तेहे सर्वच जण त्या वेळी तेथे जातीने मोर्चात घोषणा देत होते. त्या सर्व जणांना मी तर "दलितपँथर"चे मूळ संस्थापक समजतो. "अमेरिकेतील 'ब्लॅक पँथर' चळवळीपासून स्फूर्ती घेऊनचळवळीने 'दलित पँथर' नाव ठेवल्याचेही ते सांगतात. ही चळवळ वाढविण्यासाठी नामदेवढसाळ, राजा ढाले, ज.वि. पवार, रामदास सोरटे, लतीफ खाटीक, अविनाश महातेकर, अर्जुनडांगळे, प्रल्हाद चेंदवणकर, भाई संगारे, अरुण कांबळे, रामदास आठवले, गंगाधर गाडे,उमाकांत रणधीर, दयानंद मस्के, प्रीतमकुमार शेगावकर आणि टी.एम. कांबळे आदी पँथरनेत्यांनी कष्ट उपसले. आपल्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी मोर्चे, घेराओ, निदर्शने, बंद, सभा,मंत्र्याच्या गाडीपुढे आडवे पडणे, विधानसभेत उड्या मारणे, काळा स्वातंत्र्यदिन साजरा करणे,जिथे अस्पृश्यांवर अन्याय झाला तेथे जाऊन अन्यायखोराला जाब विचारणे इत्यादी उपक्रमत्यांनी राबविले.या चळवळींचे महत्त्व विशद करताना शरणकुमार लिंबाळे म्हणतात,"दलितपँथर म्हणजे दलितांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्धची जळजळीत प्रतिक्रियाच. आंबेडकराच्यानिधनानंतर मरगळ आलेल्या दलित समाजाला पँथर एक नवी ठिणगी वाटू लागली.आपल्यामुक्तीची आशा वाटू लागली. दलित पँथरच्या उदयामुळे दलित तरुणांच्या मनात विषमव्यवस्थेविषयी असलेल्या संतप्तपणाला एक नवे व्यासपीठ जसे मिळाले तसेच दलित समाजातचळवळीचे चैतन्य निर्माण झाले होते,हेही नाकारता येत नाही.

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

"वरळीची दंगल, गीतेचे दहन,शंकराचार्यावर जोडा फेकणे, शिवसेनेबरोबर झालेल्या मारामाऱ्या यांमुळे दलित पँथरचा दवदबानिर्माण झाला.'शंभर दिवस शेळी होऊन जगण्यापेक्षा एक दिवस वाघ होऊन मेलेलं वरं' असाप्रखर बाणा अस्पृश्य तरुणांत निर्माण केला. परंतु पुढे दलित पँथरमध्ये'मार्क्सवाद की आंबेडकरवाद' हा वैचारिक संघर्ष सुरू झाला.नामदेव ढसाळ 'मार्क्सवादाची' री ओढत होते, तर राजा ढाले 'आंबेडकरवादाची'. दलितपँथरने दलित, शोषित, कष्टकऱ्यांचा लढा उभारला पाहिजे ही ढसाळांची भूमिका तर दलितपँथर बौद्ध तत्त्वप्रणालीनुसार चालवली पाहिजे असे राजा ढालेंचे मत. त्यामुळे त्यांनी नामदेवढसाळ यांना 'दलित पँथर' मधून काढून टाकल्याचे जाहीर केले; परंतु नामदेव ढसाळ त्याचनावानं वावरू लागले म्हणून पुढे राजा ढालेंनी दलित पँथरच बरखास्त केली. या संदर्भात तेलिहितात, "१९७४ साली नामदेव ढसाळ यांना दलित पँथरमधून काढून टाकले, तरीही तेत्याच नावानं वावरू लागले. त्यामुळे दलित पँथर बरखास्त करण्याशिवाय इलाजच नव्हता. हेविचार प्रकर्षाने माझ्या मनात १९७५ साली आले. तोपर्यंत आणीबाणी लागू झाली. ती उठताचमी आणि ज.वि. पवार यांनी 'पँथर' बरखास्त करण्याचा निर्णय घेतला." राजा ढाले यांनीदलित पँथर' ही संघटना बरखास्त करून 'मास मुव्हमेंट' ही नवीन संघटना स्थापन केली. असेजरी असले तरी राजा ढालेंनी 'दलित पँथर'च्या माध्यमातून केलेल्या कार्याला तोड नाही. यासंदर्भात साराभाई वेळुंजकर म्हणतात,"मार्च १९७५ पर्यंत राजा ढालेंवर महाराष्ट्रात ५६ केसेस विविध कोर्टात चालू होत्या. ..... या केसेस सांभाळूनही कम्युनिस्टांच्या कचाट्यातून निगैररिपब्लिकनांच्या एकीच्या नाटकातून दलित पँथर वाचवली ती ढालेंनी." महाराष्ट्रात विविधन्यायालयांत राजा ढालेंवर झालेल्या विविध खटल्यांवरुनच त्यांनी अस्पृश्यांच्या प्रश्नासंदर्भातकेलेले कार्य लक्षात येते. पुढे पँथरच्या बरखास्तीला आक्षेप घेऊन अरुण कांबळे, भाई गारे, रामदास आठवले,उमाकांत रणधीर, वामन निंबाळकर, दयानंद मस्के यांनी 'दलित पँथर' चे पुनरुज्जीवन करून'भारतीय दलित पँथर'असे नामकरण केले. आजही ही चळवळ टिकून आहे.याचे कारण सांगतानाशरणकुमार लिंबाळे म्हणतात, "त्याचे कारण म्हणजे पँथर जनतेच्या समस्यांशी प्रामाणिकराहिली आहे. तुटपुंजी आर्थिक व्यवस्था,स्वत:च्या प्रचारयंत्रणेचा अभाव आणि प्रशिक्षित कार्यकर्तेनाहीत, असे असूनही पँथरची चळवळ व्यापक बनली आहे.याचे कारण म्हणजे,पँथरकार्यकर्त्यांच्यामनातील आंबेडकरांविषयी अमाप श्रद्धा, दलित समाजाविषयीचा जिव्हाळा आणि विषमसमाजव्यवस्थेविरुद्धचा प्रखर विद्रोह, हे होय. "नामदेव ढसाळ, राजा ढाले एकत्र होते तेव्हाहीआणि नंतरही दलित पँथर सजग राहिलेली दिसून येते. छात्रवृत्ती, बॅकलॉग, आरक्षण, नामांतर,मंडल आयोग, रिडल्सचा प्रश्न अशा विविध मुद्यांवर पँथर आघाडीवर राहिली आहे. आंबेडकरोत्तर काळातला विराट लढा म्हणून नामांतराच्या लढ्याचा उल्लेख केला जातो.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव 'मराठवाडा विद्यापीठाला' देण्यात यावे म्हणून सुमारे १७वर्षे हा लढा लढला. या क्रांतिसूर्याच्या नावासाठी अनेक भीमवीरांनी आपल्या प्राणाची आहुती दिली. पोचिराम कांबळे, पँथर गौतम वाघमारे, जनार्दन मवाडे, गोंविद भुरेवार, दिलीप रामटेके, चंदर कांबळे, नारायण गायकवाड, शरद पाटोळे, रोशन बोरकर, कु. सुहासिनी बनसोड, कु.प्रतिभा तायडे आदी कार्यकर्ते बाबासाहेबांच्या नावासाठी शहीद झाले. या शहिदांच्या अजोडकर्तृत्वाची नोंद आंबेडकरोत्तर विचारवंतांनी घेतली आहे वास्तविक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मराठवाडा ही आपली कर्मभूमी मानली होती. मराठवाड्यासारख्या मागासलेल्या प्रदेशात उच्च शिक्षणाची निकड अधिक आहे, हे जाणूनत्यांनी औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली. त्यांच्या ह्या कार्यामुळेतेमराठवाड्यातील शैक्षणिक चळवळीचे प्रणेते ठरले. मराठवाड्याच्या भूमीवर त्यांनी केलेल्याकार्याचे उचित स्मारक असावे म्हणून मराठवाडा विद्यापीठाला 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर'ह्यांचे नाव द्यावे, अशी मागणी पुढे आली. ०७जुलै १९७७ ला जाहीर मागणी सर्वप्रथम नवस्थापितपँथरचे सरचिटणीस गंगाधर गाडे यांनी केली. ०१ जुलै १९७७रोजी औरंगाबादच्या सरस्वती भुवनप्रांगणावर मराठवाड्यातील सर्वपक्षीय विद्यार्थी युवक संघटनांनी एकत्र येऊन 'विद्यार्थी कृती समिती' स्थापना केली होती. त्यांनीही इतर मागण्यांबरोबर मराठवाडा विद्यापीठास डॉ.

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani



बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्या, या मागण्याची समावेश केल्याचे प्रा. डॉ. सुधीर गव्हाणे नमूद करतात. २७ जुलै १९७८ ला महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत बहुमताने तो ठराव मंजुर झाला;परंतु ठराव संमत झाल्याचे कळताच मराठवाड्यात दलितविरोधी दंगली ठराव सुरू झाल्या. ह्या दंगली गोरगरिबांची घरे उद्धवस्त झाली. संपुर्णजनजीवन विस्कळीत झाले.

मराठवाडा विद्यापीठाला डॉ. आंबेडकरांचे नाव द्यावे म्हणून भारतीय दलित पँथर, मास मुव्हमेंट (राजा ढाले),दलित मुक्तिसेना (प्रा. जोगेन्द्र कवाडे)लढा तीव्र केला. प्रा.जोगेन्द्र कवाडे ह्यांनी तर नागपूर ते औरंगाबाद असा 'लॉंग मार्च' काढला.ह्या लाँग मार्चमध्ये हजारो तरुण सहभागी झाले. लाँग मार्च काढण्यापाठीमागचा उद्देश सांगतानाप्रा.जोगेन्द्र कवाडे म्हणतात, "नामांतरासाठी असे आंदोलन व्हावे ज्यामुळे संपूर्ण देशाचे, सर्वजगाचे लक्ष या आंदोलनाकडे लागावे, राज्याचे सरकार दलितांच्या मानवी मूल्यांना कसेपायदळी तुडवीत आहे हे जगजाहीर व्हावे, दलितांच्या व्यथा जगाच्या वेशीवर टांगता याव्यात,असे आंदोलन उभारावे यासाठी स्वतः तासन्तास मी विचार करत असे. ....... आंदोलनाचाधाक बसावा, दहशत निर्माण व्हावी, संपूर्ण महाराष्ट्र व देशातील जनता या आंदोलनाशीएकरूप व्हावी, अशा आंदोलनाच्या शोधात असताना 'लाँग मार्च'ची कल्पना सुचली. "संपूर्णमहाराष्ट्रातून ठिकठिकाणी लाँग मार्च निघाले. नामांतर प्रश्नही वातावरणनिर्मिती करण्यात लाँग मार्च व प्रा.जोगेन्द्र कवाडे यांचा फार मोठा वाटा आहे. त्यांचे महत्त्व प्रतिपादन करतानाताराचंद्र खांडेकर म्हणतात, "प्रा. जोगेन्द्र कवाडे यांचे नामांतर आंदोलनातील कार्य ऐतिहासिकआहे. त्यांनी काढलेला लाँग मार्च हा जसा ऐतिहासिक आहे तसाच त्यांना मिळालेला जनतेचाउत्तुंग प्रतिसाद अविस्मरणीय म्हणावा लागेल. लॉंग मार्च हे जसे मराठवाडा विद्यापीठ नामांतराशीसंलग्न असे क्रांतिकार्य होते तसेच ते व्यापक अशा आंबेडकरी सम्यक क्रांतीचे सजग प्रत्यंतरहोते. "सवर्णांनी केलेल्या अन्याय-अत्याचारापुढे नमून न जाता दलितांनी आपली मागणीसतत पुढे रेटली. नामांतरासाठी अनेक तरुणांनी आत्मदहन केले.

दंगली, सत्याग्रह, जेलभरो आंदोलने सातत्याने चालू असताना अखेर शासनाला नमते द्यावे लागले. व तत्कालीन मुख्यमंत्री मा. शरद पवारांनी यांनी १४ जानेवारी १९९४ला'डॉ.बाबासाहेबआंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' असा नामविस्तार केला. आंबेडकरोत्तर काळात भूमिहीनांच्यालढ्यानंतर मोठ्या दिमाखाने नोंदविला जाणारा ऐतिहासिक लढा म्हणून नामांतरलढ्याकडेपाहावे लागेल. जगाच्या कानाकोपऱ्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळे या विद्यापीठाचे नावगेले आहे.थोडक्यात, आंबेडकरोत्तर कालखंडात आंबेडकरी विचार रुजविण्यासाठी, अन्यायालावाचा फोडण्यसाठी ज्या चळवळी उभारल्या त्या चळवळींचे महत्त्व विचारवंतांनी व्यक्त केलेआहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता व सामाजिक न्याय ही मानवी मूल्ये त्या चळवळींच्या मुळाशीअसल्याचे त्यांनी प्रतिपादले आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

1. कसबेडॉ. रावसाहेब, रिपब्लिकन पक्ष ऐक्य, वास्तव आणि भवितव्य, सुगावा प्रकाशन,पुणे, प्र. आ. १९९८, पृष्ठ क्र. ०१
2. डांगळे अर्जून, आंबेडकरी चळवळीचे अंतरंग, लोकवाङ्मय गृह मुबई, दु.आ-.०७. पृ.४९
3. पचार ज.वि., आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळी-खंड पहिला, कौशल्य प्रकाशन,औरंगाबाद, व्दि. वि.आ. २००७, पृष्ठ क्र. ८२
4. मुरूगकर डॉ. लता, दलित पँथर चळवळ, सुगावा प्रकाशन,पुणे, प्र. आ.१९९५,पृष्ठ क्र.५३
5. चेंदवणकर प्रल्हाद, दलित पँथर, संपादन- शरणकुमार लिंबाळे, सुगावा प्रकाशन, पुणे,प्र. आ. १९८९, पृष्ठ क्र.
6. लिबाळे डॉ. शरणकुमार, दलित पँथर, सुगावा प्रकाशन, पुणे प्र. आ. १९८९, पृष्ठ क्र. ०३

7. ढाले राजा, दलित पँथरची संस्थापना : वस्तुस्थिती आणि विपर्यास, फुले-आंबेडकरविचारप्रसार केन्द्र, पुणे, प्र. आ. २००२, पृष्ठ क्र. ८७

8. वेळुंजकरसाराभाई, दलित पँथरची संस्थापना : वस्तुस्थिती आणि विपर्यास, फुले आंबेडकरविचारप्रसार केन्द्र, पुणे, प्र. आ. २००२, पृष्ठ क्र. ९१

9. लिंबाळे डॉ. शरणकुमार, दलित पँथर, सुगावा प्रकाशन, पुणे प्र. आ. १९८९, पृष्ठ क्र. ०९

10. गव्हाणे डॉ. सुधीर, नामांतर लढा : एक शोधयात्रा, परिवर्तन प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९९६, पृष्ठ क्र. २२

11. कवाडे जोगेन्द्र, अधिष्ठान (नामांतर विशेषांक), संपादक युवराज धवडगे, दि. १४ जानेवारी२०१०, पृष्ठ क्र. ५५

**PRINCIPAL**
**Late Ramesh Warpudkar (ACS)**
**College, Sonpeth Dist. Parbhani**